# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:13.03.2026** **वार: शुक्रवार**

---

1. पंतप्रधान आज प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या बविसाव्या हप्त्याचं वितरण करणार
2. पश्चिम आशियातील अस्थिरतेच्या काळातही भारत एक विश्वासार्ह राष्ट्र म्हणून खंबीरपणे उभा असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. देशात घरगुती एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असल्याचा केंद्र सरकारचा पुनरुच्चार आणि
4. एफआयएच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेमध्ये भारताच्या महिला संघाचं स्थान निश्चित

**<u>पीएम किसान-आसाम दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून 2 दिवसांच्या आसाम दौऱ्यावर आहेत. या दौऱ्या दरम्यान ते आज पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेच्या 22 व्या हप्त्याचं वितरण करणार आहेत. सुमारे 9 कोटी 32 लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 18 हजार 640 कोटी रुपये थेट लाभ हस्तांतरण पद्धतीनं जमा होणार आहेत. असं केंद्रीय कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना आत्तापर्यंत 4 लाख 9 हाजर कोटींहून अधिक रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली असून हा हप्ता लागू झाल्यानं आत्तापर्यंतची एकूण रक्कम 4 लाख 27 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होईल. असंही चौहान यांनी सांगितलं. या भेटी दरम्यान पंतप्रधान आज 47 हजार 800 कोटी रुपयांच्या विकास कामांची पायाभरणी देखील करणार आहेत.

**<u>एनएक्सटी बैठक</u>**

पश्चिम आशियातील अस्थिरतेच्या काळातही भारत जागतिक स्तरावर एक प्रतिष्ठित आणि विश्वासार्ह राष्ट्र म्हणून खंबीरपणे उभा आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीत आयोजित एन एक्स टी परिषदेत ते काल बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले...

**21वीं सदी का ये कालखंड ना भूतो न भविष्यति जैसा है। एक तरफ युद्ध की विभिषिका है, सप्लाई चेन फिर से तहस-नहस हो रही है संयुक्त राष्ट्र जैसी वैश्विक संस्थाओं की प्रासंगिकता पर सवालिया निशान लग रहा है, और ऐसे कालखंड में हमारा भारत इन विपरीत परिस्थितियों में भी आगे बढ़ रहा है। आज दुनिया इतिहास के जिस महत्वपूर्ण पड़ाव पर खड़ी है, उस पड़ाव पर जिस देश के नाम सबसे ज्यादा चर्चा में है- वो है भारत।**

पश्चिम आशियातील संघर्षामुळं पुरवठा साखळीमध्ये निर्माण झालेल्या अडथळ्यांवर मात करण्यासाठी सरकार आवश्यक पावलं उचलत असून, या परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेऊन असल्याचंही त्यांनी सांगितलं. ऊर्जा क्षेत्रातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे, पश्चिम आशियातील संघर्षाचा ताण सामान्य नागरिकांना सहन करावा लागू नये, यासाठी सरकार सर्व आवश्यक प्रयत्न करत असून प्रत्येक निर्णय जनतेच्या हिताचा असेल अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली.

**<u>हरदीपसिंग पुरी</u>**

देशात कच्च्या तेलाचा पुरवठा सुरळीत सुरू असून घरगुती एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असल्याचा पुनरुच्चार केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी केला आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे, जागतिक ऊर्जा

पुरवठ्यात निर्माण झालेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर, सरकारनं केलेल्या उपाय योजनांबाबत पुरी यांनी काल लोकसभेत निवेदन दिलं. घरगुती एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असून घरगुती गॅस सिलिंडरची नोंदणी केल्यानंतर वितरण होण्यासाठी लागणारा कालावधी पूर्वीप्रमाणेच अडीच दिवसांचा आहे. देशातील 33 कोटी कुटुंबांना, प्रमुख्यानं गरीब आणि वंचित घटकांना, अखंडित एलपीजी पुरवठा करण्याला सरकारचं प्राधान्य आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. हरदीपसिंह पुरी लोकसभेत निवेदन करत असताना विरोधी पक्षांच्या सदस्यांनी घोषणाबाजी करत गोंधळ घातला. रशियाकडून 30 दिवसांसाठी तेल खरेदीची परवानगी अमेरिकनं भारताला दिल्याच्या मुद्द्यावरुन लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीका केली. दरम्यान संसदेत आज 2025-26 च्या उत्तरार्धातील पुरवणी अनुदान मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू राहणार असून त्यावर मतदान होईल. अर्थमंत्री निर्मला सीतारामन या चर्चेला उत्तर देतील. राज्यसभेत आज ग्रामीण विकास मंत्रालयाच्या कामकाजावर चर्चा होईल.

**नियंत्रणकक्ष**

महाराष्ट्रात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत, आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनानं जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसंच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगानं आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश अन्न आणि नागरी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, अशी ग्वाही अन्न आणि नागरी पुरवठा विभागानं दिली आहे.

**दिल्ली सरकार एलपीजी**

राष्ट्रीय राजधानी दिल्लीमध्ये डिझेल, पेट्रोल आणि घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत सुरू असून इंधनाचा तुटवडा नसल्याची ग्वाही दिल्ली सरकारनं दिली आहे. नागरिकांनी घाबरून जाऊन अतिरिक्त खरेदी करणं तसंच साठवणूक करणं टाळावं असा सल्ला दिला आहे. इंधन पुरवठयामध्ये व्यत्यय निर्माण होण्याच्या अफवांकडे दुर्लक्ष करण्याचं आवाहनही केलं आहे. काळाबाजार आणि साठेबाजीला आळा घालण्यासाठी तयार करण्यात आलेली विशेष पथकं कसून तपासणी करत आहेत.

**पीएम इराण चौकशी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कीयन यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. या चर्चेदरम्यान पश्चिम आशियातील गंभीर परिस्थिती, या भागातील वाढता तणाव, जीवित आणि मालमत्तेचं झालेलं नुकसान याबाबत चिंता व्यक्त केल्याचं पंतप्रधान मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. भारतीय नागरिकांची सुरक्षितता, त्याचबरोबर इंधन आणि आवश्यक वस्तूंची अखंडित वाहतूक सुनिश्चित करण्याला भारताचं सर्वोच्च प्राधान्य राहील, असं मोदी यांनी म्हटलं आहे. शांतता आणि स्थैर्यासाठी भारत कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. मुसद्देगिरीचा अवलंब करत संवाद साधण्याचं मोदी आवाहन मोदी यांनी केलं आहे.

**पश्चिम आशिया**

पश्चिम आशियामध्ये मागील काही तासांपासून लष्करी हालचालींचं प्रमाण आणखी तीव्र झालं असून अनेक भागात या काळात हल्ले आणि हवाई प्रतिहल्ल्यांचा जोर वाढला आहे. इस्रायली लष्करानं तेहरानवर केलेल्या हल्ल्यांमध्ये बसिज या निमलष्करी दलाच्या चौक्यांना लक्ष्य केल्याचं म्हटलं आहे. या राजधानीच्या शहरातील वाहतूक रोखण्यासाठी इराणी सुरक्षा दलांनी रस्त्यांमध्ये तयार केलेले अडथळे हटवण्याच्या मुख्य उद्देशानं हे हल्ले करण्यात आले. इराणच्या अधिकृत सूत्रांनी मात्र अद्याप यामुळे झालेल्या नुकसानाची खात्रीलायक माहिती दिलेली नाही. जागतिक जहाज वाहतुकीतील महत्त्वाचा मार्ग असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीच्या आसपासच्या भागातही कमालीचा तणाव आहे. ही सामुद्रधुनी आमचं तणाव निर्माण करण्याचं साधन असल्याचं इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाघेई यांनी सांगितलं. मात्र थेट इराणी नौदलाशी वाटाघाटी केल्यास काही जहाज सामुद्रधुनी पार करण्याची परवानगी दिली जाऊ शकेल, असंही बाघेई यांनी नमूद केलं. सौदी अरेबियामधील ऊर्जा सुविधांना लक्ष्य करणारे हल्ले हवाई संरक्षण प्रणालीद्वारे रोखण्यात आले. बहारिनवरही ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचे अनेक हल्ले झाल्याचं वृत्त आहे.

## इस्रायल पीएम दावा

इस्रायली हल्ल्यांमध्ये इराणचे प्रमुख अणुशास्त्रज्ञ मारले गेले असल्याचं इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी म्हटलं आहे. इराणचे नवे सर्वोच्च नेते अयातुल्ला मोज्तबा खामेनेई हे रिव्होल्युशनरी गार्डचं बाहुलं असल्याचं म्हणत सार्वजनिक ठिकाणी ते उपस्थित राहू शकत नाहीत, असं नेतान्याहू यांनी पत्रकार परिषदेत म्हटलं. त्यांनी इराणी नागरिकांना संबोधित करत त्यांना स्वातंत्र्याच्या नव्या मार्गावर पोहोचण्याचा क्षण जवळ आला असल्याचं म्हणत शेवटी ते त्यांच्या हातात असल्याचं देखील नमूद केलं.

## योगदिन

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या अनुषंगानं, 100 दिवसांच्या उलटगणनेचा प्रारंभ म्हणून नवी दिल्लीतील मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेतर्फे आज योग महोत्सव-2026 चं आयोजन करण्यात येणार आहे. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

## महिला हॉकी विश्वचषक

हैदराबाद इथं सुरू असलेल्या पात्रता स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश मिळवल्यानंतर भारताच्या महिला हॉकी संघानं आगामी एफआयएच महिला हॉकी विश्वचषक 2026 मध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे. नियमानुसार एफआयएच महिला हॉकी विश्वचषकाच्या दोन पात्रता स्पर्धा होतात, त्यातील एक भारतातील हैदराबाद इथं आणि दुसरी चिली मधील सॅन्टीएगो इथं होते. यामध्ये 7 संघांची निवड करतात. जे आगामी विश्वचषकासाठी पात्र ठरतात. उपांत्य फेरीतील भारताचा सामना आज हैदराबादमध्ये इटली विरुद्ध होणार असला तरीही भारतानं या विश्वचषक स्पर्धेतील आपलं स्थान आधीच पक्क केलं आहे. भारत जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानी असून एफआयएच महिला हॉकी विश्वचषकामध्ये सहभागी होण्याची भारताची ही नववी वेळ असेल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार